| **Headline:** NSE IFSC started operations at GIFT IFSC | |
|---|---|
| **Source:** Loksatta | **Date:** 6 June 2017 |




भारतातील सर्वात मोठा भांडवली बाजार असलेल्या राष्ट्रीय शेअर बाजार अर्थात एनएसईच्या एनएसई आयएफएससी हा नवा बाजार सोमवारी गांधीनगर येथील गिफ्ट आयएफएससीमध्ये अस्तित्वात आला. गुजरातचे मुख्यमंत्री विजय रुपानी यांच्या हस्ते या बाजाराचे पांरपरिक घंडावादनाने उद्घाटन करण्यात आले. सेबीचे अध्यक्ष अजय त्यागी, गिफ्टचे अध्यक्ष सुधीर मंकड, गिफ्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजय पांडेय, एनएसईचे अध्यक्ष अशोक चावला आदी यावेळी उपस्थित होते. एनएसई आयएफएससीचे व्यवहार १६ तास चालणार आहेत. पैकी पहिले सत्र सकाळी ८ ते सायंकाळी ५ व दुसरे सत्र सायंकाळी ५.३० ते रात्री ११.३० पर्यंत असेल.